# विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर

**VILASRAO DESHMUKH GOVERNMENT MEDICAL COLLEGE, LATUR**

मारवाडी राजस्थान शाळेजवळ, गांधी चौक, लातूर (महाराष्ट्र) ४१३५१२

Near Marwadi Rajasthan School, Gandhi Chowk, Latur.( Maharashtra ) 413512

Tel. No. © 02382-249292, (H) 02382-242199 Web Site- www.vdgmclatur.org

E. Mail – dean_gmchl@rediffmail.com

जा.क्र.विदेशावैमला/आस्था-राज/प्राध्या.सहयोगी प्राध्या./जाहीरात/ 6753 /२०२६ दिनांक:-14/०८/२०२६

## "जाहीरात"

विषय :- प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक पदे ३६४ दिवसांकरीता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करार तत्वावर भरणेबाबत

संदर्भ :१.शा.नि. क्रमांक एलईसी-२०२१/प्र.क्र.१९९/वैसेवा-३ दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२२

२. शा.नि. क्रमांक एलईसी-२०२४/प्र.क्र.१८१/वैसेवा-३ दिनांक २१ ऑगस्ट, २०२४

उपरोक्त विषयी संदर्भाधीन शासन निर्णयान्वये विहीत कार्यपध्दतीचे अनुपालन करून प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या पदावर ३६४ दिवसांकरीता तात्पुरत्या स्वरुपात करार तत्वावर नियुक्तीचे अधिकार मा. आयुक्त वै. शी. व संशोधन मुंबई यांना आहेत.

त्याअनुषंगाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर महाविद्यालय आस्थापनेवरील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक, यांची खालील विषयामध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे रिक्त पदे ३६४ दिवसांच्या कालावधीकरीता किंवा मा.शासन/संचालनालय, मुंबई यांचेमार्फत उमेदवार अथवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत/शासन निवड मंडळ अथवा नियमित उमेदवार अथवा बदलीने उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत संस्थास्तरावरील निवड समितीमार्फत कागदपत्रांची पडताळणी करुन करार तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात शासनाच्या प्रचलित नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या मानधन व गुणवत्तेनुसार भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडून खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अक्र. | पदनाम | रिक्त पदसंख्या व विषय |
|---|---|---|
| १ | प्राध्यापक | १) जीवरसायनशास्त्र - ०१<br>-------<br>एकूण - ०१ |
| २ | सहयोगी प्राध्यापक | १) अस्थिव्यंगोपचारशास्त्र -०१<br>२) मनोविकृत्तीशास्त्र -०१<br>--------<br>एकूण - ०२ |

| | |
|---|---|
| उमेदवारांनी अर्ज सादर करावयाचा कालावधी | **दि.१४/०८/२०२६ ते दि.२०/०८/२०२६**<br>**(सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत)** |
| मुलाखतीची तारीख | दि.२४/०८/२०२६ रोजी दु.१२.०० वाजता |
| मुलाखतीचे ठिकाण | अधिष्ठाता कार्यालय विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय लातूर |

त्यानुसार इच्छुक उमेदवारांनी अर्जासोबत सर्व शैक्षणीक अर्हतेचे कागदपत्र/प्रमाणपत्राच्या छायांकित साक्षांकित प्रती जोडाव्यात. उमेदवारांनी कार्यालयात प्रत्यक्ष येवून आवक-जावक शाखेस अर्ज सादर करावा व त्याबाबतची पोच घ्यावी. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करू नये ऑनलाईन अर्ज स्वीकारला जाणार नाही. उमेदवारांच्या मुलाखती संस्थास्तरावर घेण्यात येणार असुन नियुक्ती आदेश मा.आयुक्त,वै.शि.व संशोधन,मुंबई यांच्या स्तरावरुन निर्गमित करण्यात येणार असल्याने मुलाखतीच्या वेळी उमेदवारांनी मुळ प्रमाणपत्रांसह व साक्षांकित केलेल्या प्रतीसह थेट मुलाखतीच्या ठिकाणी स्वखर्चाने हजर रहावे. मुलाखतीस उपस्थीत न राहील्यास उमेदवाराचा करार नियुक्तीकरीता विचार करण्यात येणार नाही.

वरील पदांसाठी जाहीर केलेल्या रिक्त पदासाठी अर्ज मागविण्यात येत असून, वरील तक्त्याप्रमाणे रिक्त पदांच्या उपलब्धतेप्रमाणे प्रथम निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्त्या देण्यात येईल.

उमेदवारांची कागदपत्रे परिपूर्ण नसल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही. वरील पदांकरीता नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात ३६४ दिवसांसाठी असून, कोणतीही पूर्व सूचना न देता तात्पुरती करार सेवा समाप्त करण्यात येईल.

अटी व शर्ती :-

१) मा. आयुक्त, (वैद्यकीय शिक्षण) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून करार तत्वावर नियुक्ती देण्यात येईल.

२) वयोमर्यादा :- उमेदवाराचे वय शासन निर्णय दि. ०९/०२/२०२२ मधील अट क्र. १३ नूसार रुजू दिनांका पासून ३६४ दिवस किंवा वयाची ७० वर्ष पूर्ण होईपावेतो .

३) करार पद्धतीने नियुक्त उमेदवारास शासन निर्णय दि. ०९/०२/२०२२ मध्ये नमूद केल्यानुसार मानधन अनूज्ञेय असेल

४) जाहीरातीत प्रसिध्द करण्यात आलेली पदसंख्या कमी जास्त करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी राखून ठेवलेले आहेत.

५) उमेदवार या महाविद्यालया व्यतिरिक्त इतर संस्थेत कार्यरत असल्यास संस्थाप्रमुखांचे "ना-हरकत प्रमाणपत्र" अर्जासोबत जोडावे व त्या ठिकाणी राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या निरीक्षणात सहभाग नोंदविला किंवा कसे ? असल्यास केव्हा ? (तारीख नमूद करावी) व तसेच अर्जासोबत जोडावे.

६) ज्या उमेदवारांची निवड करण्यात आली असेल व ते कार्यरत असतांना सतत जास्त कालावधी पर्यंत गैरहजर असल्यास किंवा त्यांचे काम समाधानकारक नसल्यास त्यांची करार नियुक्ती तात्काळ समाप्त करण्यात येईल.

७) सदर पदांकरीता उमेदवारांची नियुक्ती निव्वळ ३६४ दिवसांसाठी अत्यंत तात्पूरत्या स्वरूपात करार स्वरूपात राहील.

८) अर्जासोबत प्रमाणपत्रांच्या छायांकित साक्षांकित करून जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही. नंतर कोणतीही कागदपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.

९) सदर नियुक्ती ही अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात असल्यामुळे आपणास या पदावर कायम स्वरुपाचे कोणतेही हक्क राहणार नाही व कायम नियुक्तीचे कोणतेही फायदे अनुज्ञेय नसतील.

१०) (अ) प्रथम द्वितीय व तृतीय वर्ष एम.बी.बी.एस. तसेच एम.डी., एम.एस.डी.एम., एमसी.एच. किंवा समतुल्य या सर्व परिक्षेची गुणपत्रिका व प्रयत्न प्रमाणपत्रे गुणपत्रिका नसल्यास परीक्षा पॉईंट, ग्रेड प्रमाणपत्र. (ब) सर्व पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी परीक्षेची डिग्री प्रमाणपत्रे व अंतिम वर्षाची गुणपत्रिका. (क) एम.एम.सी. व एम.एम.सी नुतनीकरण केलेली नोंदणी प्रमाणपत्र. (ड) जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र व आवश्यक असल्यास नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र. (ई) जन्म दाखला/शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला. (फ) पॅनकार्ड व आधार कार्डची छायाप्रत इत्यादी कागदपत्रे/प्रमाणपत्राचा एक छायांकित संच अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

अधिष्ठाता,
विलासराव देशमुख शासकीय
वैद्यकीय महाविद्यालय, लातूर

अधिष्ठाता
विलासराव देशमुख शासकीय
वैद्यकीय महाविद्यालय, लातूर

प्रति,

१) सुचना फलक वि.दे.शा.वै म लातूर.

२) उपरोक्त संबंधीत सर्व विषयातील प्राध्यापक व विभागप्रमुख, वि.दे.शा.वै.म., लातूर

३) वैद्यकीय अधिक्षक, वि.दे.शा.वै.म. व रुग्णालय लातूर

४) सूचना फलक :- अधिष्ठाता कार्यालय, विद्यार्थी विभाग, बाह्य रुग्ण विभाग, मुलांचे व मुलींचे वसतीगृह, मध्यवर्ती ग्रंथालय, वि.दे.शा.वै.म., लातूर

५) अधिष्ठाता, सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.

प्रत :-१) मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२) मा. आयुक्त, (वैद्यकीय शिक्षण) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सादर.